# जिल्हा नंदुरबार
# कोतवाल संवर्गातील पदभरतीसाठी जाहिरात2018

जाहिरात क्रमांक 1/2018

जा.क्र.

नंदुरबार जिल्हयाच्या उपविभागांतर्गत तालुक्यामधील गावांतील कोतवाल या संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता अर्हता धारक उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच www.nandurbarpariksha.com या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर पदे केवळ मानधनी व कंत्राटी असल्यामुळे कधीच शासकिय सेवेमध्ये कायम करण्यात येणार नाहीत.
**कोतवाल (तात्पुरत्या स्वरुपात)एकूण रिक्त पदे** -अक्राणी तालुका (पेसाक्षेत्र) - 8, अक्कलकुवा तालुका (पेसाक्षेत्र) - 7, नंदुरबार तालुका (पेसाक्षेत्र) - 20, नंदुरबार तालुका (पेसाक्षेत्राबाहेरील)- 12, नवापूर तालुका (पेसाक्षेत्र) - 18, तळोदा तालुका (पेसाक्षेत्र) - 12, शहादा तालुका (पेसाक्षेत्र) - 34, शहादा तालुका (पेसाक्षेत्राबाहेरील) - 15

| **ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरुवात** | **ऑनलाईनअर्ज भरण्याची अंतिममुदत** |
|---|---|
| दिनांक 20/10/2018 रोजी दुपारी12.00पासून | दिनांक 30/10/2018 सायंकाळी 05.30 पर्यंत |

**बँकेत रोखीने किंवा ऑनलाईन पद्धतीने परीक्षाशुल्क जमा करण्याचा अंतिम दिनांक** 01/11/2018

कोतवाल भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहीरात www.nandurbar.gov.in व www.nandurbarpariksha.com या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपुर्ण माहीती काळजीपुर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत.प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहित चलनाद्वारे भरलेले परिक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्ग निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरतीप्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संबंधित तहसिलदार यांना राहतील. त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

दिनांक :- 20/10/2018

तहसिलदार

नंदुरबार/नवापूर/शहादा/अक्राणी/अक्कलकुवा/तळोदा